देशोन्नती

# राज्याचे मुख्य सचिव, औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस

## प्रकाश पोहरेंच्या विनंतीनंतर बार असोसिएशनची कारवाई ■ बुस्टर डोजसाठी संपूर्ण जनतेची माफी मागण्याची सूचना

देशोन्नती वृत्तसंकलन...



**नागपूर** : औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी कोरोना लसीचे 'बुस्टर डोज'चे प्रमाणपत्र दाखविल्याशिवाय 'जुलै-ऑगस्ट' महिन्याचे वेतन दिले जाणार नाही, असे पत्रपरिषदेत औरंगाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले, अशी माहिती देऊन 'देशोन्नती'चे मुख्य संपादक यांनी औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची विनंती केली आहे. त्यावरून इंडियन बार असोसिएशने सर्वोच्च न्यायालय व मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना केल्याची नोटीस राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आणि औरंगाबादचे जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांना बजावली आहे. या नोटीसमध्ये बुस्टर डोज घेण्यासाठी सक्ती केल्यामुळे संपूर्ण जनतेची माफी मागण्याची सूचना करण्यात आली आहे.

इंडियन बार असोसिएशनच्या लीगल सेल प्रमुख ॲड. दीपाली ओझा यांनी श्रीवास्ताव आणि चव्हाण या दोघांनी बुस्टर डोज घेण्यास सक्ती करण्याचे बेकायदेशीर कृत्य केल्याचा आरोप नोटीसमध्ये केला आहे. नोटीसमध्ये म्हटले आहे की, 'देशोन्नती'चे मुख्य संपादक प्रकाश पोहरे हे 'क्यू वाईव्ह' या चॅनलच्या चर्चेत म्हणाले की, औरंगाबादचे जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना लसीचे 'बुस्टर डोज'चे प्रमाणपत्र दाखविल्याशिवाय 'जुलै व ऑगस्ट' या दोन महिन्यांचे वेतन दिले जाणार नसल्याचे पत्रपरिषद घेऊन सांगितले आणि तसे वृत्त ए बी पी माझा या चॅनेल वर पाहण्यात आले. चव्हाण यांचे हे बेकायदेशीर कृत्य थांबवून त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी केली. पोहरे यांच्या मागणीची दखल घेण्यात आली आहे. चव्हाण यांनी दि. २२ जुलै २०२२ रोजीच्या पत्रपरिषदेत कोरोना लसीचे बुस्टर डोज घेण्याचे मार्केटिंग करण्यासाठी खोटे, दिशाभूल आणि फसवणूक करणारे दावे केले असून याद्वारे त्यांनी सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना केली आहे. याप्रकारे लस घेण्यास सक्ती करणे सर्वोच्च न्यायालयाची अवमानना आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात लस घेणे किंवा न घेणे हा निर्णय प्रत्येक व्यक्तीचा वैयक्तिक अधिकार असल्याचे सांगून त्या व्यक्तीला कोणतेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निर्बंध आणून लस घेण्यास बाध्य केले जाऊ शकत नसल्याचे म्हटले आहे. लस सक्ती करणारे सर्व शासकीय निर्णय मागे घेण्याचा आदेश न्यायालयाने दि. २ मे रोजी दिला आहे. तर उच्च न्यायालयानेही लस घेण्यावरून एखाद्याचा पगार किंवा इतर कोणत्याही सुविधा रोखणे बेकायदेशीर कृत्य ठरविले आहे. त्यामुळे आपणाविरोधात कारवाई का करू नये, अशी विचारणाही ॲड. ओझा यांनी केली आहे. लस घेण्यास सक्ती करणे तुमचे कृत्य गुन्हेगारी स्वरूपाचे आणि नागरिकांचा जीव धोक्यात घालणारे आहे. उच्च न्यायालयाने लसीचा परिणाम तपासण्याचा आदेश दिला आहे, असेही नोटीसमध्ये म्हटले आहे.

### मृत्यू, दुष्परिणामासाठी जबाबदार धरणार

नोटीसमध्ये मुख्यसचिव श्रीवास्तव व जिल्हाधिकारी चव्हाण यांना लस घेतल्यामुळे एखादा नागरिक, शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्याचा मृत्यू किंवा कोणताही दुष्परिणाम झाल्यास त्याकरिता या दोघांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. आपणाविरोधात भादंवि कलम ५२, १०९, १६६, ३३६, ४०९, ११५, ३०४ (अ), १२०(ब), ३४, न्यायालय अवमानाना कायदा १९७१चे कलम २(ब), १२ आणि इतर कलमान्वये कारवाई करण्यात येईल आणि संबंधिताला नुकसान भरपाई वसुलीचा अधिकार आहे. या गैरकायदेशीर कृत्यासाठी जाहीर माफी मागून बार असोसिएशनला कळवावे, असेही नोटीसमध्ये बजावण्यात आले आहे.